# राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**क्र.रामाआ/नाशिक/तक्रार क्र. : ५३३/२०२१/नाशिक**

१ श्री. चंद्रकांत नारायण लासुरे, : तक्रारदार
रा.फ्लॅट नं.३, युनियन पार्क,
सहकार नगर, नाशिक-१.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा, : प्रतिवादी
सहाय्यक पोलीस आयुक्त (विभाग-२),
नाशिक शहर, एच.डी.एफ.सी.बँकेसमोर, शरणपूर
रोड, नाशिक, ता.जि.नाशिक.

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा, : प्रतिवादी
पोलीस उप आयुक्त,
परिमंडळ-१, नाशिक शहर,
ता.जि.नाशिक.

**ऑनलाईन सुनावणी दिनांक - २५/०३/२०२२**

तक्रारदार यांनी दिनांक २०/०९/२०२१ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे. त्यामध्ये दिनांक २५/०३/२०२२ रोजी meet.google.com/fyg-bdzv-aty या गुगल मिट कोडद्वारे आयोजित ऑनलाईन सुनावणीसाठी तक्रारदार उपस्थित होते. तत्कालीन/विद्यमान जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

तक्रारदार यांनी त्यांच्या दिनांक २०/०९/२०२१ रोजीच्या तक्रार अर्जात नमूद केले आहे की, त्यांच्या दिनांक ३०/०७/२०१८ रोजीच्या माहिती अर्जासंदर्भात आयोगाने द्वितीय अपील क्रमांक २८५६/२०१८/नाशिक वरील निर्णय दिनांक ०२/०८/२०२१ अन्वये पुढीलप्रमाणे आदेश दिले आहेत. "विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, श्रीमती खन्ना यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ३०/०७/२०१८ रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांनी मागितलेल्या माहितीसंदर्भात कार्यालयातील उपलब्ध माहिती नोंदणीकृत पोचदेय डाकेने विनामुल्य पुरवावी." तथापि, संबंधित जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या आदेशानुसार माहिती पुरविली नसल्याने मागितलेली माहिती मिळावी, अशी विनंती सदर तक्रार अर्जान्वये तक्रारदार यांनी केली आहे.

सुनावणीदरम्यान आयोगाच्या द्वितीय अपील आदेशावेळी कार्यरत व सध्या देखील कार्यरत असलेले जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, आयोगाच्या द्वितीय अपील क्रमांक २८५६/२०१८/नाशिक वरील दिनांक ०२/०८/२०२१ रोजीच्या पारित आदेशास अनुसरुन तक्रारदारास दिनांक १८/०९/२०२१ रोजीच्या पत्रान्वये विनामूल्य माहिती पुरविली आहे.

सुनावणीदरम्यानचा युक्तीवाद व आयोगास सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता असे दिसून येते की, आयोगाच्या उपरोक्त नमूद द्वितीय अपील क्रमांक २८५६/२०१८/नाशिक वरील दिनांक ०२/०८/२०२१ रोजीच्या पारित आदेशानुसार जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्यानुसार तक्रारदार यांना दिनांक १८/०९/२०२१ च्या पत्रान्वये कार्यालयातील उपलब्ध माहिती विनामूल्य पुरविल्याचे नमूद केले आहे. तथापि, सुनावणीदरम्यान तक्रारदार यांनी नमूद केले की, जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या आदेशानुसार कोणतीही माहिती पुरविली नाही.

प्रस्तुत प्रकरणी आयोगास सादर केलेले अभिलेख तसेच उपरोक्त बाबी विचारात घेता तक्रारदार यांनी त्यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविली नसल्याबाबत आयोगास शपथपत्र सादर करणे. तसेच आयोगाच्या द्वितीय अपील आदेशावेळी कार्यरत जन माहिती अधिकारी यांनी तक्रारदारास माहिती पुरविली असून सदर माहिती उपलब्ध कागदपत्रावरुन खरी माहिती पुरविली असलेबाबत शपथपत्र आयोगास सादर करणे योग्य होईल.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे अंतरिम आदेश पारित करीत आहे.

**अंतरिम आदेश**

१) आयोगाच्या द्वितीय अपील सुनावणीवेळी कार्यरत जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त (विभाग-२), नाशिक शहर यांनी हा निर्णय मिळाल्यापासून ०७ दिवसांच्या आत आयोगाकडील द्वितीय अपील क्रमांक २८५६/२०१८/नाशिक वरील दिनांक ०२/०८/२०२१ रोजीच्या आदेशानुसार तक्रारदारास दिनांक १८/०९/२०२१ च्या पत्रान्वये पुरविण्यात आलेली माहिती कार्यालयात उपलब्ध असलेल्या कागदपत्रांच्या आधारे सत्य असलेबाबतचे शपथपत्र आयोगास सादर करावे. तसेच तक्रारदारास जी माहिती पुरविली त्याची साक्षांकित प्रत देखील त्यासोबत सादर करावी.

२) तक्रारदार यांनी हा निर्णय मिळाल्यापासून ०७ दिवसांच्या आत आयोगाकडील द्वितीय अपील क्रमांक २८५६/२०१८/नाशिक वरील दिनांक ०२/०८/२०२१ रोजीच्या आदेशानुसार जन माहिती अधिकारी यांनी कोणती माहिती पुरविली नसल्याबाबत आयोगास शपथपत्र सादर करावे.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

प्रति,

पोलीस आयुक्त, नाशिक शहर पोलीस आयुक्तालय, के.टी.एच.एम.कॉलेजसमोर गंगापूर रोड, नाशिक. यांनी आयोगाच्या आदेशाची प्रत संबंधित अधिकारी यांना हस्तांतरीत करुन पोच उलटटपाली आयोगाला सादर करावी. तसेच आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी सुनिश्चित करुन अहवाल ३० दिवसांचे आत सादर करावा.

---

क्र.रामाआ-नाशिक/तक्रार क्र.५३३/२०२१/नाशिक/ ओ-१८२८ दिनांक- 20/09/2022